शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद पालघर
कार्यालय क्र.१७, जिल्हा परिषद इमारत, कोळगाव, बोईसर रोड, पालघर (प.) ४०१४०४
ईमेल आयडी :- edu.palghar@gmail.com
*****************************************************************

दि. ११ / १० / २०२३

**जिल्हा परिषद पालघर अंतर्गत अनुसूचित जमाती (ST) पेसा क्षेत्रातील शिक्षण सेवक निवड प्रकियापुर्व तयारी साठी समुपदेशन वेळापत्रक**

दि. १३/१०/२०२३ रोजी सकाळी १०:०० वाजता सोबतच्या यादीतील १ ते ५ च्या गटातील पात्र उमेदवारांचे समुपदेशन जननायक बिरसा मुंडा सभागृह, दालन क्रमांक २१२, दुसरा मजला, येथे आयोजित केले आहे. यादीतील उमेदवारांनी आपल्या सर्व मुळ कागदपत्रांसह वेळेवर उपस्थित रहावे.

सदर समुपदेशन हे पेसा क्षेत्रातील शिक्षण सेवक निवड प्रकियेची पुर्व तयारी म्हणून शालेय शिक्षण विभागाकडील शासन निर्णय दिनांक २१ जून २०२३ नुसार करण्यात येत आहे. सदर उमेदवारांनी या कार्यालयास सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे पडताळणीअंती यादी तयार करण्यात आलेली आहे. यादीतील उमेदवारांनी समुपदेनासाठी सर्व मुळ कागदपत्रांसह उपस्थित राहणे बंधनकारक आहे. तसेच समुपदेशनापुर्वी/दरम्यान अथवा नंतर कागदपत्रांमध्ये चुक, तफावत अथवा तक्रार उद्भवल्यास सदर प्रकरणी कार्यालयाची खात्री झाल्यास उमेदवारास कोणतीही पुर्व सुचना न देता अपात्र करण्यात येईल, तसेच सदर समुपदेशन हे निवड प्रक्रियेची पुर्व तयारी म्हणून करण्यात येत आहे, समुपदेशन झाले म्हणजे आपली निवड झाली असे उमेदवारांनी समजु नये, निवडीबाबतचे सर्व अंतिम अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांचे राहतील, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(भानुदास पालवे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद पालघर